ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यात भाईंदर येथे अप्पर तहसिल, मिरा-भाईंदर कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक- प्राफेब-२०१७/प्र.क्र.५५/म-१०
मंत्रालय, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

वाचा:- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे पत्र क्र.मशा/कार्या-५/प्रशासन/अपर तहसीलदार कार्यालय निर्मिती/२०१६, दिनांक १९.०१.२०१६.

प्रस्तावना:-

ठाणे हे जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असून त्याचा विस्तार झपाटयाने होत आहे. ठाणे तालुक्यात ठाणे, नवी मुंबई व मिरा-भाईंदर या ३ महानगरपालिका व ग्रामीण क्षेत्राचा समावेश आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्याची वाढती लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ, वाढते औद्योगिकरण व नागरीकरण इ.बाबींमुळे सध्याच्या ठाणे तहसिल कार्यालयावर कामकाजाचा मोठा ताण पडत आहे. त्यामुळे प्रशासकीय कामातील सोयीच्या दृष्टीने तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यात मिरा-भाईंदर येथे स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यात भाईंदर येथे स्वतंत्र अप्पर तहसिलदार कार्यालय, मिरा-भाईंदर स्थापन करण्यास व त्यानुषंगाने खालीलप्रमाणे पद मंजुरीस व अन्य अनुषंगिक बाबीस प्रस्तुत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. विद्यमान ठाणे जिल्ह्यातील ठाणे तहसिल प्रशासन बळकट करण्याच्या दृष्टीने अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांच्या नवीन कार्यालयासाठी खालील ७ पदे नियमित वेतनश्रेणीवर मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पदे ही सध्याच्या त्या-त्या संवर्गाचा एक भाग राहतील.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतनश्रेणी (रु.) (सातव्या वेतन आयोगानुसार)	मंजूर पदाची संख्या	एकूण
१	अप्पर तहसिलदार	S-१९- ५५,१००- १,७५,१००/-	१	१
२	नायब तहसिलदार	S-१४- ३८,६००- १,२२,८००/-	१	१
३	अव्वल कारकून	S-१२- ३२,०००- १,०१,६००/-	१	१
४	लिपिक-टंकलेखक	S-०६- १९,९००-६३,२००/-	४	४
		एकूण -	**७**	**७**

२. तसेच सदर नवीन कार्यालयासाठी १ वाहनचालक व १ शिपाई यांच्या सेवा गरजेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. ठाणे जिल्ह्यातील तहसिल कार्यालय, ठाणे तसेच अप्पर तहसिल कार्यालय, मिरा-भाईंदर यांचे कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे महसुली मंडळे व गावे राहतील.

अ.क्र.	**कार्यालयाचे नाव**	**महसुली मंडळे**	**एकूण महसुली गावे**
१.	तहसिल कार्यालय, ठाणे	एकूण मंडळे - ५ ठाणे (८ गावे), बाळकुम (९ गावे), मुंब्रा (१३ गावे) दहिसर (२१ गावे) बेलापूर (३० गावे)	८१
२.	अप्पर तहसिल कार्यालय, मिरा-भाईंदर	एकूण मंडळे - १ भाईंदर (१९ गावे)	१९

४. ठाणे जिल्ह्यातील तहसिलदार, ठाणे तसेच अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल मंडळांतर्गत तलाठी साझे व त्यामध्ये अंतर्भूत होणाऱ्या गावांची यादी प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांचे स्तरावर करण्यात यावी.

५. अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर, ता.ठाणे, जि.ठाणे यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, ठाणे हे काम पाहतील.

६. अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर, ता. ठाणे, जि. ठाणे यांना या शासन निर्णयान्वये कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

७. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३ पोटकलम (३) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, तहसिलदार, ठाणे यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांना, त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

८. ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुक्यात अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय स्थापन करण्याकरिता येणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३ - जिल्हा प्रशासन, ०९३ जिल्हा आस्थापना (०१) सर्वसाधारण आस्थापना (योजनेत्तर) (०१) (०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. मंजूर तरतूद अपुरी पडत असल्यास वाढीव तरतूदीची मागणी करावी व ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

९. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४४१/आपुक, दिनांक ७.०९.२०१९ व नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीने दि.८.०७.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०९०९१३३३३३८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIRAJ VISHNU PHALLE

Digitally signed by RAVIRAJ VISHNU PHALLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d1a28181e23383c4e20fc8d5ff3d1c5505f086ea0b1eee531142b2aeec83a590, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bea42246bc0bcf44a3792edbf80cc8f17c935de2c6b145c96db4be6a8a381506, ou=REVENUE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAVIRAJ VISHNU PHALLE
Date: 2019.09.09 16:26:31 +05'30'

(रविराज फल्ले)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
७. अप्पर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
८. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
९. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१०. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
११. प्रधान सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१२. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, ठाणे
१५. उपविभागीय अधिकारी, ठाणे, जि.ठाणे.
१६. तहसिलदार, ठाणे, जि.ठाणे.
१७. अप्पर तहसिलदार, मिरा-भाईंदर, ता. ठाणे, जि.ठाणे.
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
२०. कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (कार्यासन ई-३/ई-७/ई-८/ई-९/ई-१०/ब-१/ज-४)
२१. वित्त विभाग (का.विसू-१/अर्थसंकल्प-६/व्यय-९/आ.पु.क.), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
२२. महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने
२३. निवड नस्ती, कार्यासन म-१०.